

धगधगती मुंबई वृत्तपत्र संपादक भीमराव धुळप यांच्या घरी विराजमान झालेले विघ्नहर्ता



नवसाला पावणारा विश्वाचा राजा ( GSB सेवा मंडळ, मुंबई )


महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील अंक...

साप्ताहिक RNI : MAH/MAR/2011/40762 पोस्टल नंबर : MCW/354/2021-23

# धगधगती मुंबई

website:www.dhagdhagtimumbai.in E-mail : dhagdhagtimumbai@gmail.com

वर्ष : १६ अंक : ३१, संपादक - भिमराव हिंदुराव धुळप, मंगळवार, दिनांक १५ सप्टेंबर २०२६ ते २१ सप्टेंबर २०२६ पाने : ४ मूल्य : २ रुपये


## मुंबईसह महाराष्ट्रात गणेशोत्सवाचे जंगी स्वागत

## ढोल-ताशांचा गजर, 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष

मुंबई : विघ्नहर्त्या गणरायाच्या आगमनाने मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला आहे. सोमवार, १४ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थीनिमित्त घरगुती तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी मोठ्या उत्साहात श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली. ढोल-ताशांचा गजर, फुलांची सजावट, विद्युत रोषणाई आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने मुंबईतील विविध भाग दुमदुमून गेले.

लालबागचा राजा, मुंबईचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणी, परळचा राजा यांसह विविध मानाच्या गणपतींच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी झाली. गणेशमूर्तींच्या आगमन मिरवणुकांमध्ये तरुणाईसह महिला, ज्येष्ठ नागरिक आणि बालगोपाळांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

मुंबईबरोबरच पुणे, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, सातारा, सांगली, कोकण, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक शहरांतही गणरायाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. सार्वजनिक मंडळांनी सामाजिक संदेश देणारे देखावे, पर्यावरणपूरक सजावट आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी वाहतूक, सुरक्षा आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरही विशेष लक्ष देण्यात आले आहे. मुंबईतील मेट्रो सेवांचा कालावधीही उत्सव काळात वाढविण्यात आला आहे.

श्रद्धा, उत्साह आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देणाऱ्या गणेशोत्सवामुळे महाराष्ट्रात सर्वत्र आनंदाचे आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे.



## २०२९ पूर्वी भाजपशासित २१ राज्यांत समान नागरी कायदा लागू करणार : अमित शाह

मुंबई : देशातील भाजपशासित २१ राज्यांमध्ये २०२९ पूर्वी समान नागरी कायदा लागू करण्यात येईल, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी मुंबईत पत्रकार परिषदेत दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शासनप्रमुख म्हणून २५ वर्षांची कारकीर्द पूर्ण केल्याच्या निमित्ताने भाजपकडून १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत देशभरात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार असल्याचेही शाह यांनी सांगितले.



मुंबई दौऱ्यात विविध कार्यक्रमांना उपस्थित राहिल्यानंतर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे पत्रकारांशी संवाद साधताना शाह यांनी केंद्र सरकारच्या कामगिरीचा आढावा घेतला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.

शाह म्हणाले की, भाजपने निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी अनेक ठोस निर्णय घेतले आहेत. समान नागरी कायदा लागू करणे हे पक्षाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असून, २०२९ पूर्वी भाजपशासित २१ राज्यांमध्ये त्याची अंमलबजावणी केली जाईल.

विरोधकांवर टीका करताना त्यांनी 'फेक नॅरेटिव्ह'च्या माध्यमातून जनतेमध्ये गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. मोदी सरकारच्या काळात गरिबी निर्मूलन, घरकुल, किसान सन्मान निधी, उज्ज्वला योजना, वीज, रस्ते आणि रेल्वे क्षेत्रात मोठी प्रगती झाल्याचा दावा त्यांनी केला. 'जेन-झी' आंदोलनाबाबत बोलताना शाह यांनी लोकशाही मार्गाने होणाऱ्या आंदोलनाच्या अधिकाराचा सरकार पूर्ण आदर करते, असे स्पष्ट केले.



## गणेश विसर्जनासाठी मुंबई महापालिकेची जय्यत तयारी

मुंबई : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशभक्तांची सुरक्षितता, स्वच्छता, वाहतूक नियंत्रण, आरोग्यसेवा आणि विसर्जन व्यवस्थेसाठी मुंबई महापालिकेने जय्यत तयारी केली आहे. यंदा गणेशमूर्ती विसर्जनासाठी मुंबईत ६७ नैसर्गिक विसर्जनस्थळे आणि ३८३ कृत्रिम तलाव उपलब्ध करण्यात आले आहेत.

विसर्जनाच्या काळात स्वच्छता राखण्यासाठी तीन हजारांहून अधिक सफाई कर्मचारी, मोबाईल कचरा गाड्या तसेच aस्वयंसेवी संस्थांची मदत घेतली जाणार आहे. निर्माल्य संकलनासाठी ४९८ निर्माल्य कलश आणि ३२६ निर्माल्य वाहने उपलब्ध ठेवण्यात आली आहेत.

विसर्जनस्थळी गर्दीचे नियोजन आणि आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी २२८ नियंत्रण कक्ष, १,१३२ जीवरक्षक, १० मोटरबोटी आणि २३ जर्मन तराफे तैनात करण्यात आले आहेत. तसेच रात्रीच्या वेळी सुरक्षिततेसाठी ६,०५२ फ्लडलाइट व सर्चलाइट, २३६ प्रथमोपचार केंद्रे, ७५ निरीक्षण मनोरे आणि ८५ रुग्णवाहिकांची व्यवस्था करण्यात आली आहे.

मुंबईत दरवर्षी १२ हजारांहून अधिक सार्वजनिक आणि दोन लाखांहून अधिक घरगुती गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होते. त्यामुळे महापालिकेने पोलीस, बेस्ट, गणेशोत्सव मंडळे, वीज वितरण कंपनी आणि अन्य संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून विसर्जनाची व्यवस्था केली आहे.

## धगधगती मुंबई परिवारातर्फे आरती संग्रहाचे प्रकाशन

मुंबई : धगधगती मुंबई वृत्तपत्र परिवारातर्फे यंदाही गणेशभक्तांसाठी आरती संग्रह प्रकाशित करण्यात आला. महाराष्ट्र बाजार पेठेचे अध्यक्ष डॉ. कौतिक दांडगे सर यांच्या शुभहस्ते या आरती संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी माहीम विधानसभा निरीक्षक यशवंत विचले, प्रसिद्ध निवेदक संतोष लिंबोरे पाटील, विशाल चाफे आणि संपादक भीमराव धुळप आदी मान्यवर उपस्थित होते.



धगधगती मुंबई परिवाराच्या वतीने सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांसोबतच धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांनाही सातत्याने प्रोत्साहन दिले जाते. गणेशोत्सव तसेच आगामी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांना उपयुक्त ठरावा, या उद्देशाने आरती संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले आहे.

## संपादकीय

# गणरायाला साकडे

हे गजानना, सोमवारपासून तुझा उत्सव सुरू झाला आहे. घरोघरी तुझी भक्तगण आराधना करण्यात येत आहे. १० दिवस सुरू राहणाऱ्या उत्सवात तुला कसलीच उणीव भासू नये याची दक्षता असंख्य श्रद्धाळू घेतील. तुझा हा उत्सव म्हणजे हे गणराया, विविध कलावंत आणि सुगरणींना एक पर्वणीच असते. मूर्ती कारण्यापासून मंडप डेकोरेटर्स, मखर करणारे, हात, ढोल-ताशे आणि बॅन्जो पथकवाले, चित्रकार, इलेक्ट्रिशियन यांना आपली कला दाखविण्याची मोठी संधी वक्रतुंडा, तुझ्या उत्सवात लाभते. याशिवाय फुलांच्या सजावटी करणारे, हार बनवणारे, तुला पितांबर नेसवणारे, तुझी मूर्ति देखणी दिसावी, म्हणून हिऱ्या-मोत्यांनी तुला सजविणारे गेले काही दिवस अहोरात्र मेहनत घेत होते. आज त्यांना सार्थक झाल्यासारखे वाटत असेल. आपण केलेली सजावट, देखावे कसे दिसतात ? त्यात काही त्रुटी आहेत का ? त्रुटी असतील तर काही सुधारणा करता येईल का ? याचा विचार करून सुधारणा करण्यात काही गुंतले असतील. शिवाय मोदक-लाडू बनवणारे हे गर्क आहेत. पेढे-मिठाई ही मोठ्या प्रमाणावर प्रसारात वाटली जाणार आहे. कोणी नवस म्हणूनही १० दिवस तुझी सेवा करतात. कोकणात एरवी अनेक घरे बंद असतात. परंतु तुझ्या उत्सवासाठी लाखो चाकरमानी आपापल्या गावाला घरात येतात. तुझे आगमन होणार म्हणून एरवी बंद असलेली घरे-अंगण स्वच्छ करतात. येताना सजावटीचे सामान आणतात. मोठ्या भक्ती भावाने तुझी सेवा सर्व कुटुंब एकत्र येऊन करतात, तर कोकणात शक्ती-तुऱ्याचे, भजनांचे कार्यक्रम करून आपला आनंद भक्तगण द्विगुणीत करतात. तुझ्यामुळे त्यांना त्यांच्यातील सुप्त गुण दाखविण्याची संधी मिळते. तुझी आरती करण्यासाठी वाडीतील सर्व श्रध्दाळू एकत्र येऊन प्रत्येक घरात जातात. १० दिवसांचा त्यांचा कार्यक्रम ठरलेला असतो. एकेका घरात दिवस ठरवून भजन केले जाते. शक्ती-तुऱ्याचे नाच करणारी पथके घरोघरी जाऊन एक तरी बारी करतात. कोकणात आता तरुण मंडळी फारशी उरलेली नाहीत, परंतु अजूनही तुझ्या उत्सवासाठी आल्यानंतर ही मंडळी आपली परंपरा जोपासतात. मात्र बदलत्या काळानुसार तुझ्या सजावटीतच नव्हे तर सर्वच बाबतीत परिवर्तन होताना दिसत आहे. शहरातील मंडळांचे उत्सव जसे होतात तसे बदल घरगुती उत्सवातही करताना स्थानिक गावकरी आणि चाकरमानी दिसत आहेत. आता काही जण हे गजवदना, तुझी मूर्ती अगदी ५ फूट उंचीपर्यंत स्थापित करीत आहेत. शहरात सार्वजनिक उत्सव मंडळांमध्ये तुझी मूर्ती अधिकाधिक उंच करण्याची स्पर्धा याही वर्षी कायम आहे. आकर्षक देखावे नेत्रदीपक विद्युत रोषणाई, भव्य मंडप अशी चढाओढ मंडळांमध्ये लागली आहे. हे विनायका, तुझ्या आगमन मिरवणुकीतही डीजेचा दणदणाट लेझर लाईटचे प्रखर झोत सोडलेले असतात. त्यात वाजवली जाणारी चित्रविचित्र गाणी हे सर्व तू कसे सहन करतोस हे विघ्नेश्वरा ? भाविक-भक्तांचा हा अतिउत्साह अनेकांना असह्य होत आहे. आजारी वृद्ध, लहान मुले यांच्यासह कित्येकांना डीजेच्या दणदणाटाच त्रास होत असतो, पण ते विरोधही करू शकत नाहीत. कारण तसे केले तर त्यांना धर्मविरोधी ठरविण्यात येते. म्हणून ते गप्प राहतात. आता ४० फूट उंचीपर्यंत तुझी मूर्ती काही सार्वजनिक उत्सव मंडळांनी स्थापित केली आहे. मुंबई आणि भिवंडीत तुझी उंच मूर्ती मिरवणुकीने नेताना क्षतिग्रस्त झाली. मुंबईत भुलेश्वर येथे मंडळाच्या अध्यक्षांसह दोघेजण प्राणास मुकले तर ६ जण जखमी झाल्याचे वृत्त प्रसारित झाले. या उत्साही भाविकांना तू हे विघ्नेश्वरा, बुद्धी दे. श्रद्धा-भक्ती ही मूर्तीच्या उंचीच नसते ती आपल्या मनात असते. आगमन मिरवणूक असो वा तुझी विसर्जन मिरवणूक असो त्यासाठी किती यातना तुला होत असतील ? पण त्याचे भान अतिउत्साही मंडळींना नसते. काही उत्सव मंडळांच्या मंडपात मागच्या बाजूला हजारो रुपये जुगारात उधळले जातात. हे विघ्नहर्ता गजानना, तुझा उत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्याची कल्पना लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची या उत्सवानिमित्त समाज संघटित करणे, ब्रिटिशांविरोधात जनजागृती करणे हा त्यांचा उद्देश होता. अर्थात मोठ्या प्रमाणावर हा उद्देशी सफल झाला. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांविरोधात समाजात जागृती निर्माण झाली. त्यामुळे स्वातंत्र्यलढ्याला अधिक चालना मिळाली हे नाकारता येणार नाही. लोकमान्य टिळकांनी १८९३ मध्ये हे गणेशा, तुझा उत्सव सार्वजनिक स्वरूपात करण्यास प्रारंभ केला. त्या घटनेला यंदा १३३ वर्षे पूर्ण झाली. तुझ्या या सार्वजनिक उत्सवाचा शतकोत्तर रौप्य महोत्सवही दिमाखात साजरा करण्यात आला. आता सार्वजनिक उत्सव मंडळांची संख्या कमालीची वाढली आहे. मुंबई महानगरात सुमारे ११ हजार सार्वजनिक उत्सव मंडळं आहेत. मंडळांची संख्या वाढली, पण हे मोरेश्वरा, तुझ्या उत्सवाचा दर्जा घसरलाय. हे मार्केटिंगचे आणि ए-आयचे युग आहे. मार्केटिंगचा सर्वच उत्सवांवर प्रभाव जाणवत आहे. हे एक जनता दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे सार्वजनिक उत्सव मंडळांवर राजकीय पक्ष आणि नेते मंडळींचा प्रभाव जाणवत आहे. काही नेत्यांच्या नावानेच काही मंडळ ओळखली जाऊ लागली आहेत. यात आणखी एक दुर्दैवाची गोष्ट म्हणजे हे भालचंद्रा, तुला गल्लीबोळातील राजा, महाराजा ही विशेषणे लावली गेली आहेत. खरे तर तू विश्वात्मक विश्वेश्वरा, चराचरात तू व्यापून उरलेला आहेस. असे असताना मंडळातील अतिउत्साही कार्यकर्त्यांनी आपल्या अहंकारामुळे गल्लीबोळ आणि विभागाचा राजा-महाराजा ठरवून तुला सिमित करून टाकले आहे. त्यामुळे चित्रकार दुर्लक्षित होऊ लागले आहेत. हे बाप्पा, गेल्या काही वर्षात तुझ्या उत्सवाचे रूप वेगाने बदलत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञान या बदलामागे आहे. तुझ्या उत्सवात लाखो लोकांचा सहभाग असतो. त्यांचा उत्साहही शिगेला पोहोचलेला असतो. अशावेळी सुरक्षा, आरोग्य आणि पर्यावरण या तिन्ही गोष्टींची जबाबदारी मोठी असते. उच्च तंत्रज्ञानामुळे मंडळांना वेळीच निर्णय घेता येतात. हे तंत्रज्ञान मोठ्या मंडळांपासून सोसायटीच्या उत्सव मंडळांपर्यंत पोहोचत आहे आणि तंत्रज्ञानाचे जसे फायदे आहेत तसे तोटेही आहेत. भाविक-भक्तही आता स्वतः कल्पनाशक्तीला ताण देताना दिसत नाहीत. तीच स्थिती मूर्तिकार आणि अन्य कलावंतांचीही झालेली दिसत आहे. हे गजानन काही विवेकी मंडळी शंभरहून अधिक डेसिबलच्या पुढे स्पीकरना रस्त्यावर उतरून विरोध दर्शवितात, परंतु याबाबतीत मंडळांचे कार्यकर्ते काय विचार करतात ? त्यांच्याकडे विवेकी मन आहे का ? याचे उत्तर सध्यातरी नाही असेच दिसत आहे. कारण हे गणराया, तुझ्या उत्सवाचा उत्साह आता शिगेला पोहोचला आहे. अशावेळी शहाणपणाचा विचारही कोणाला पटेल, असे वाटत नाही. तेव्हा हे पार्वतीसुता, तू बुद्धीची देवता म्हणून प्रसिद्ध आहेस. काही विकृत परंपरा पसरवू पाहणाऱ्यांना सद्बुद्धी दे, एवढीच तुझ्या चरणी प्रार्थना !

## आरपीआयच्या आंदोलनानंतर डॉ. आंबेडकरांचे हनुमानरूपी चित्र प्रदर्शनातून हटवले



मुंबई : जहांगीर आर्ट गॅलरीतील एका चित्रप्रदर्शनात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना हनुमानाच्या रूपात दाखविणारे चित्र प्रदर्शित करण्यात आल्याने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय)च्या कार्यकर्त्यांनी आक्षेप घेत आंदोलन केले. दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्ष संजय पवार यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन शांततेच्या मार्गाने करण्यात आले.

डॉ. आंबेडकरांचे हनुमानरूपी चित्र हे दिशाभूल करणारे असून ते तातडीने हटवावे, अशी मागणी कार्यकर्त्यांनी गॅलरी व्यवस्थापन व चित्रकाराकडे केली. त्यानंतर संबंधित चित्र प्रदर्शनातून हटविण्यात आले. जहांगीर आर्ट गॅलरीच्या व्यवस्थापक के. जी. मेनन यांनी या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त करून भविष्यात अशी पुनरावृत्ती होणार नाही, अशी ग्वाही दिली. चित्रकार राजेश केदारे यांनीही आपली चूक मान्य करून माफी मागितल्याची माहिती संजय पवार यांनी दिली. यावेळी विशाल दिवार, विजय जाधव, मनोहर जाधव, डॉ. राजेंद्र जाधव, डॉ. रमेश ईपाकायला, सुनील गरूड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारताना दिलेल्या २२ प्रतिज्ञांमधील विचारांचा संदर्भ देत, महामानवाच्या प्रतिमेचा वापर करताना ऐतिहासिक व वैचारिक संदर्भांचा आदर राखावा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्यांनी केले.

## ब वर्ग व क वर्ग पतसंस्थांसाठी सुलभ कर्ज धोरण निश्चित करा;

### मुंबई बँकेच्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत हरिश्चंद्र जंगम यांची मागणी

मुंबई : मुंबईतील ब वर्ग व क वर्ग ऑडिट असलेल्या पतसंस्थांना विशेष बाब म्हणून कर्ज मंजुरी देऊन कर्ज उचल धोरणातील अटी व शर्ती शिथिल कराव्यात, अशी मागणी वैभव सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष हरिश्चंद्र जंगम यांनी मुंबई बँकेच्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत केली.

यावेळी मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण भाऊ दरेकर, पतसंस्थांचे मार्गदर्शक शिवाजीराव नलावडे तसेच बँकेचे संचालक मंडळ उपस्थित होते. सभेत बोलताना जंगम म्हणाले की, मुंबईतील अनेक ब वर्ग व क वर्ग पतसंस्था सध्या आर्थिक अडचणींचा सामना करीत आहेत. बाजारातील मोठ्या पतसंस्था व सहकारी बँकांशी असलेल्या स्पर्धेमुळे या संस्थांवर आर्थिक दबाव वाढत आहे. त्यामुळे अशा संस्थांना विशेष बाब म्हणून सुलभ कर्ज उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

आपल्या संस्थेचे उदाहरण देताना जंगम यांनी सांगितले की, वैभव सहकारी पतसंस्थेने ४० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला असून, सन २०१७



मध्ये संस्थेने बँकेकडे सुमारे ४० लाख रुपये रक्कम भरली होती. त्यावेळी संस्थेच्या प्रगतीसाठी पुन्हा कर्ज उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, कर्ज धोरणातील मर्यादांमुळे संस्थेला अपेक्षित प्रमाणात कर्ज उचलता आले नाही.

कर्जवाटपाला मर्यादा आल्याने मुदतपूर्ती होणाऱ्या ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी उपलब्ध निधीचा मोठा भाग वापरला जातो. परिणामी नवीन कर्जवाटपावर परिणाम होऊन संस्थेचे उत्पन्न घटते आणि आर्थिक अडचणी वाढतात. चांगले कर्जदार कर्ज उपलब्ध न झाल्यास अन्य मोठ्या पतसंस्था अथवा सहकारी बँकांकडे वळतात. त्यामुळे प्रामाणिकपणे काम करूनही पतसंस्थांच्या प्रगतीला मर्यादा येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"मुंबईतील ब वर्ग व क वर्ग ऑडिट असलेल्या पतसंस्थांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांच्यासाठी विशेष कर्ज मंजुरी व कर्ज उचल धोरण निश्चित करावे. अटी व शर्ती शिथिल करून सुलभ पद्धतीने कर्ज उपलब्ध करून द्यावे. पतसंस्थांची शिखर बँक म्हणून मुंबई बँकेने पतसंस्थांच्या आर्थिक उन्नतीसाठी दिलासा द्यावा," अशी मागणी हरिश्चंद्र जंगम यांनी केली.

या मागणीवर उत्तर देताना मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण भाऊ दरेकर यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त केली. अशा सर्व संस्थांना लवकरात लवकर एकत्रित करून त्यांच्या अडचणींचा विचार करण्यात येईल आणि कर्ज मंजुरीबाबत योग्य निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

## उंडाळेतील बँक ऑफ महाराष्ट्रचे ATM बंद; सणासुदीत नागरिकांची गैरसोय

कराड : ऐन सणासुदीच्या काळात उंडाळे येथील बँक ऑफ महाराष्ट्रचे ATM वीजपुरवठ्याअभावी बंद असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. परिसरातील नागरिक व बँक ग्राहकांसाठी हे ATM महत्त्वाचे असताना सेवा बंद असल्याने पैसे काढण्यासाठी नागरिकांना इतर ठिकाणी धाव घ्यावी लागत आहे.

सणासुदीच्या दिवसांत आर्थिक व्यवहार वाढलेले असताना ATM सेवा बंद असल्यामुळे ग्राहकांना वेळ आणि प्रवासाचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यास पर्यायी वीजव्यवस्था किंवा अन्य पर्यायी सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

ATM सेवा नियमित आणि अखंडित राहण्यासाठी बँक प्रशासनाने आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यामुळे उंडाळे येथील ATM वीजपुरवठ्याअभावी बंद असल्याची तातडीने दखल घेऊन पर्यायी व्यवस्था करावी आणि ATM सेवा पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# उत्सव समाजप्रबोधनाचा, वसा मानवतेचा!

## 'धारावीचा किल्लेश्वर' श्री हनुमान सेवा मंडळाचा स्तुत्य उपक्रम

मुंबई : 'धारावीचा किल्लेश्वर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धारावीतील श्री हनुमान सेवा मंडळातर्फे यंदाच्या सार्वजनिक श्रीगणेशोत्सवानिमित्त साकारण्यात आलेल्या प्रबोधनकारी देखाव्याचे उद्घाटन रितुताई तावडे यांच्या हस्ते करण्यात आले.

मंडळाने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही पर्यावरणपूरक शाडू मातीपासून निर्मित श्रीगणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका, बेस्ट, मुंबई पोलीस आणि रेल्वे विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समर्पित सेवेला अधोरेखित करणारा समाजप्रबोधनात्मक देखावा यंदा साकारण्यात आला आहे.

'धारावीचा किल्लेश्वर' आणि 'दुर्गसखा' यांच्या संयुक्त विद्यमाने 'ज्ञानपेटी – बाप्पा माझा, एक हात मदतीचा' हा सामाजिक उपक्रमही राबविण्यात येत आहे. बाप्पाच्या चरणी मोदक, हार-फुलांऐवजी वही-पेन अर्पण करून शहापूरजवळील दुर्गम भागातील गरजू जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना



शैक्षणिक साहित्य पोहोचविण्याचा संकल्प मंडळाने केला आहे. उत्सवाच्या माध्यमातून शिक्षण, पर्यावरण आणि मानवतेचा संदेश देण्याचे कार्य मंडळ करीत आहे.

## धगधगती मुंबई'च्या दिवाळी अंकासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

मुंबई : 'धगधगती मुंबई' वृत्तपत्र परिवारातर्फे गेली १६ वर्षे अखंडपणे दिवाळी अंक प्रकाशित केला जात आहे. दिग्गज लेखकांसह नवोदित लेखक, कवी आणि साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा अंक दरवर्षी विविध विषयांवरील दर्जेदार साहित्य साहित्यरसिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करीत आहे. या दिवाळी अंकाला अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

यंदाच्या दिवाळी अंकात कविता, चारोळी, विनोद, चुटके, राशिभविष्य यांसह विविध साहित्य प्रकारांचा समावेश करण्यात येणार आहे. तसेच अन्न व औषध प्रशासनातील कडक नियमांची अंमलबजावणी करून अन्नभेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या माध्यमातून जनतेचे प्राण वाचविणाऱ्या आयएसआय अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कार्यावर विशेष लेख प्रकाशित करण्यात येणार आहे. पर्यावरणासह सामाजिक, शैक्षणिक व अन्य विषयांवरील साहित्यालाही स्थान दिले जाणार आहे.

साहित्यप्रेमी, लेखक व कवींनी आपले साहित्य १० ऑक्टोबर २०२६ पर्यंत PDF स्वरूपात dhagdhagtimumbai@gmail.com या ई-मेलवर पाठवावे. अधिक माहितीसाठी संपादक भीमराव धुळप : ९२२११७६८४ यांच्याशी संपर्क साधावा.

## महत्त्वाच्या घडामोडी.....

### महाराष्ट्रात गणेशोत्सवाला उत्साहात सुरुवात....

आजपासून राज्यभर गणेशोत्सवाला सुरुवात झाली. मुंबईसह विविध शहरांत घरगुती व सार्वजनिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. लालबागचा राजा, चिंचपोकळी आदी प्रमुख मंडळांच्या दर्शनासाठी मोठी गर्दी झाली आहे.

### मुंबईत गणेशोत्सवासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त....

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी मोठा सुरक्षा बंदोबस्त तैनात केला आहे. ३७ डीसीपींसह १६ हजारांहून अधिक पोलिस कर्मचारी सुरक्षेसाठी तैनात असल्याची माहिती समोर आली आहे.

### मुंबईत पावसाचा इशारा...

मुंबई आणि महाराष्ट्रात आजही पावसाचे वातावरण आहे. हवामान विभागाने मुंबईत काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वरून राजाची हजेरी.

### मनोज जरांगे यांच्या मुंबई आंदोलनाला पोलिसांची परवानगी नाही....

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांनी मुंबईत आंदोलनाची घोषणा केली आहे. मात्र मुंबई पोलिसांनी १९ सप्टेंबरपासून प्रस्तावित आंदोलनाला सुरक्षेच्या कारणास्तव परवानगी नाकारली आहे. यावरून राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

### महाराष्ट्रात समान नागरी कायद्याबाबत मुख्यमंत्र्यांचे संकेत...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात समान नागरी कायदा लागू करण्याबाबत समिती स्थापन करण्यात आल्याचे सांगितले. समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## आयुष्यमान भारत, एसटी सवलत, पोस्टाच्या योजनांना पत्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

मुंबई : मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांसाठी आयोजित आयुष्मान भारत, एसटी सवलत कार्ड आणि पोस्टाच्या विविध योजनांच्या शिबिराला पत्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

विविध शासकीय योजनांचा लाभ पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांना मिळवून देण्यासाठी या विशेष शिबिराचे आयोजन मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्राचे चीफ पोस्टमास्टर जनरल रामचंद्र जायभाये यांच्या हस्ते करण्यात आले, तर शिबिराचा समारोप परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

अधिस्वीकृती नसणार्या पत्रकारांनाही एसटी प्रवासात शंभर टक्के सवलत मिळावी, यासाठी मंत्रालयाने प्रस्ताव अर्थ विभागाकडे




पाठविला असून, त्यासाठी आम्ही पाठपुरावा करीत असल्याचे प्रताप सरनाईक यांनी सांगितले. तर 'पोस्ट आपल्या दारी' ही संकल्पना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविण्यात पोस्ट खाते अग्रेसर असल्याचे जायभाये यांनी यावेळी सांगितले.

शिबिरात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना तसेच आयुष्मान वय वंदन योजनेसाठी नोंदणी करण्यात आली. तसेच एसटी महामंडळाचे महिला, ज्येष्ठ नागरिक व अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी सवलत कार्ड, पोस्ट ऑफिसच्या विविध बचत योजना, आधार कार्ड, अपघाती विमा, पोस्टल लाइफ इन्शुरन्स (PLI) व 'माय स्टॅम्प'आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, अशी माहिती पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिली.

या शिबिराचे समन्वयक म्हणून राजेंद्र साळसकर यांनी काम पाहिले. यावेळी पत्रकार संघाच्या विश्वस्त राही भिडे, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, खजिनदार जगदीश भोवड, संयुक्त कार्यवाह राजेश माळकर, कार्यकारिणी सदस्य विनोद साळवी आणि राजेश खाडे उपस्थित होते. तर जीपीओचे अधिकारी विलास गावकर, राजेंद्र राणे, विजय चौलाखे, एसटीतर्फे धर्मेंद्र जाधव, योगेश तोडकर तसेच आयुष्मान भारत योजनेतर्फे सुमित निगडे, प्रबोध पवार यांनी शिबिरासाठी सहकार्य केले.

## श्रीगणेशोत्सव २०२६ साठी नवी मुंबई महापालिका सज्ज

नवी मुंबई : श्रीगणेशोत्सव २०२६ दि. १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान उत्साहात साजरा होणार असून, गणेशभक्तांच्या सुरक्षिततेसह पर्यावरणपूरक विसर्जनासाठी नवी मुंबई महानगरपालिका सज्ज झाली आहे. नागरिकांनी इकोफ्रेंडली व प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन महापौर श्रीमती सुजाता पाटील आणि महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

सार्वजनिक मंडपांसाठी ऑनलाईन परवानगी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, १४० हून अधिक मंडळांनी अर्ज केले आहेत. न्यायालयीन आदेश व शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सहा फुटांपर्यंतच्या मूर्ती कृत्रिम तलावांत विसर्जित करणे अपेक्षित आहे. त्यासाठी बेलापूर, नेरुळ, वाशी, तुर्भे, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली आणि दिघा विभागांत मिळून १७० कृत्रिम विसर्जन तलाव उभारण्यात आले आहेत. याशिवाय २२ नैसर्गिक विसर्जनस्थळे उपलब्ध आहेत. एकूण १९२ विसर्जनस्थळांवर स्वयंसेवक, लाईफगार्ड, अग्निशमन जवान, वैद्यकीय पथके, सीसीटीव्ही, विद्युत व जनरेटर व्यवस्था करण्यात आली आहे. नैसर्गिक स्थळांवर तराफे, मुख्य ठिकाणी सूचना देण्यासाठी व्यासपीठे आणि निर्माल्य संकलनासाठी स्वतंत्र कलश व वाहने ठेवण्यात आली आहेत.

नागरिकांनी कृत्रिम तलावांचा अधिकाधिक वापर करून जलप्रदूषण रोखावे आणि शांततेत, सुरक्षित व पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.



महाराष्ट्र तरुण मित्र मंडळ सार्वजनिक गणेशोत्सव, (N.T.M.M. THE BOSS)



पार्श्वगायिका - नम्रता उमेश वेस्वीकर यांच्या घरचा गणपती (रोप्य महोत्सवी वर्ष), मानखुर्द



श्री. संतोष शंकर चव्हाण यांच्या घरातील विराजमान झालेले बाप्पा







ठा. म. पा चे जेष्ठ नगरसेवक, दलित मित्र
मा. श्री. राजन किणे (कोळीवाडा मुंब्रा) यांच्या घरचा गणराया


शकुंतला आनंदा कदम धारावी यांच्या घरी विराजमान
कदम परिवाराचा बाप्पा ( रोप्य महोत्सवी वर्ष)


संजय धुमाळ, खांबदेव नगर धारावी
यांच्या घरी गणरायाचे आगमन


गुरुम फॅमिली, विघ्नहर्ता सोसा. करी रोड
यांच्या घरचा गणपती बाप्पा


दीपक धुळप,नवशालीभदर ग्राम
बिल्डींग नं. -९ रूम नं. -००१
काशी मीरा - मीरारोड


महेंद्र बागडे विठ्ठल सोसायटी
खांबदेव नगर धारावी


विजय नथुराम कर्जावकर
विलेपार्ले (पूर्व) यांच्या घरचे
कर्जावकराचे गणपती बाप्पा


पल्लवी थोरवे - सिनेतारका यांच्या
घरी विराजमान झालेले गणराया



निशिकांत कारंडे कांदिवली यांच्या घरचे गणपती बाप्पा सहकुटुंब


शरद
प्रतिभाशाली
सांस्कृतिक
प्रतिष्ठान चे
अध्यक्ष राजाराम
बुवा शेलार
यांच्या नेरूळ,नवी
मुंबई येथील घरी
गणपती बाप्पा चे
आगमन


दत्ता मराठे
(गोरेगाव)
यांच्या घरी
बाप्पाचे
विराजमान


संतोष धुळप घणसोली
येथील त्यांच्या निवासस्थानी
विराजमान गणपती बाप्पा

Printed and published by Bhimrao Hindurao Dhulap, Printed at Plaskot Industries, 23, Municipal Indl. Estate, K. K. Marg, Satrasta, Mumbai -400 011 and published at C/66, Mukuda Nagar, A-Ward, Laxmi Mandir, Dharavi, Mumbai - 400 017. Editor : Bhimrao Hindurao Dhulap, Mob. 9221117684
Any litigation against the content will be entertained under the jurisdiction of Mumbai only.

हे साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक, मालक श्री. भिमराव हिंदुराव धुळप यांनी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीयल इस्टेट, के. के. मार्ग, सातरस्ता, मुंबई -४०० ०११ येथून छापून सी/ ६६ मुंकुंदनगर, ए/ वॉर्ड, लक्ष्मी मंदिर, धारावी, मुंबई - ४०० ०१७ येथून प्रकाशित केले. संपादक : भिमराव हिंदुराव धुळप. मो. ९२२१११७६८४
(प्रकाशित बातम्या / लेखांशी सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद मुंबई न्यायकक्षेत)